# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(आस्थापना विभाग)

एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली - ४४२६०५

दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४, email:- gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि/आस्था/ ५६५२ /२०२१ दिनांक: २४.०५.२०२१

## अधिसुचना

**म.सा.वि. अधिनियम, २०१६, कलम ११(३) (क) तीन व विद्यापीठ निदेश क्र ७/२०२१ मधील अनुच्छेद ९ नुसार नामनिर्देशनासाठी पात्र नामांकनाची अंतिम यादी**

या अधिसुचनेद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या कुलगुरूपदी, कुलगुरूंची नियुक्ती करण्यासाठी योग्य अशा नावांची कुलपतींना शिफारस करण्याकरीता म.सा.वि.अधिनियम, २०१६ च्या कलम ११(३) अंतर्गत गठीत समितीवर कलम ११(३) (क) तीन अन्वये व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषद यांनी एकत्रितरित्या एक सदस्य नामनिर्देशित करण्याच्या अनुषंगाने दि. २५/०५/२०२१ रोजी संयुक्त सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदरहू सभेचे सुचनापत्र दि. ०४/०५/२०२१ रोजी सर्व सन्माननिय सदस्यांना निर्गमीत केलेले आहे.

विद्यापीठ निदेश क ७/२०२१ मधील अनुच्छेद ९ नुसार सदरहू नामनिर्देशन, सभेचे सुचनापत्र पाठविण्यापासून १५ दिवसात म्हणजेच दि. १९/०५/२०२१ रोजी विद्यापीठाकडे सादर करावयाचे होते. त्यानुसार विद्यापीठास अंतीम दिनांकापर्यंत एकुण ४ नामनिर्देशन अर्ज प्राप्त झाले.

विद्यापीठ निदेश क ७/२०२१ मधील अनुच्छेद १५ नुसार विद्यापीठास प्राप्त नामनिर्देशनाची छाननी करण्यासाठी मा. कुलगुरू महोदयांकडून गठीत समितीची सभा दि. २१/०५/२०२१ रोजी विद्यापीठात संपन्न झाली आणि सदर समितीच्या अहवालानुसार दि. २५/०५/२०२१ रोजी आयोजीत संयुक्त सभेमध्ये म.सा.वि. कलम ११(३) (क) तीन अन्वये नामनिर्देशनासाठी पात्र/अपात्र नामनिर्देशनाची अंतिम यादी दि. २२/०५/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सभेच्या वेळापत्रकानुसार आज दि. २४/०५/२०२१ दुपारी २.०० वाजेपर्यंत नामांकन मागे घ्यावयाचे होते. त्यानुसार डॉ. टी. जी. सिथाराम, संचालक, भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, गुवाहाटी यांचे नामांकन मागे घेण्यात आलेले असल्यामुळे नामांकन मागे घेतल्यानंतर खालीलप्रमाणे अंतीम पात्र नामांकनाची यादी घोषीत करण्यात येत आहे. कृपया संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | नामनिर्देशीत व्यक्तीचे नाव |
|---|---|
| १ | डॉ. हिमांशु राय<br>संचालक, भारतीय प्रबंध संस्थान, इंदौर |
| २ | डॉ. प्रमोद एम. पडोळे<br>संचालक, विश्वेस्वरया नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलाजी, नागपूर |

24.5.2021

(डॉ. अनिल चिताडे) 9 P.M.

कुलसचिव (प्र.)

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली